B.S.P's
Gomantak Ayurveda Mahavidyalaya & Research Centre
Vajem, Shiroda - Goa

## भारतीय संस्कृति प्रबोधिनीचे गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्र व कामाक्षी आरोग्य धाम येथे पंचकर्म थेरपिस्ट अभ्यासक्रम व कार्यशाळा संपन्न

गोव्यातील एकमेव असलेले व सातत्याने गेली २७ वर्षे गोमंतकीयांसाठी सेवेस तत्पर असलेल्या भारतीय संस्कृति प्रबोधिनीच्या गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्र व कामाक्षी आरोग्य धाम येथे कार्यरत असलेल्या पंचकर्म थेरापीस्ट साठी एक अभ्यासक्रम व कार्यशाळा घेण्यात आली. हा कार्यशाळा कार्यक्रम १ जुलै ते १२ ऑगस्ट पर्यंत सुरू होता. आजकालच्या ह्या महामारीच्या काळात सुध्दा केंद्रींय आरोग्य खात्यातर्फे दिलेल्या आदेशानुसार व त्या तत्वांनुसार हा कार्यक्रम घेण्यात व राबविण्यात आला. ह्या कार्यक्रमाची सुरूवात गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्राच्या प्राचार्या डॉ. अनुरा प्र. बाळे यांच्या मार्गदर्शनात झाली. त्यानंतर गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्रामध्ये कार्यरत असलेले सर्व वैद्यांनी त्यात हातभार लावला. या कायक्रमाचे उद्विष्ट पंचकर्म परीचारकांचे / थेरापीस्ट चे ज्ञान वृध्दिंगत करून त्यांना नवीन उमेद व चालना देणे होते.

या कार्यक्रमाची सांगता १२ ऑगस्ट रोजी झाली. या वेळी मंचावर संस्थेचे अध्यक्ष श्री. पां.के. घाटे, संस्थेचे सचिव श्री. गजानन बखले व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुरा प्र. बाळे उपस्थित होत्या. मंचावर उपस्थित मान्यवरांनी या यशस्वी कार्यक्रमाबद्दल सर्वांचे अभिनंदन केले व पंचकर्म थेरापीस्टना मानपत्रक देण्यात आले. वैद्य अवधुत अय्या यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यात मोलाचा वाटा उचलला. वैद्य रिजुता पाटील यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.